**Minutes of the 8/20 Authority Meeting held under the Chairmanship of Shri. Vinodkumar J. Tiwari on Tuesday, the 29th day of September, 2020 at 03.00P.M at the Conference Hall, 9th floor, Centre-1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai – 400 005.**

**The following Members attended the meeting:-**

| | | |
|---|---|---|
| i. | Shri. Vinodkumar J. Tiwari | Member (Law) |
| ii. | Shri. S. T. Sangale | Member (Economics) |

**Other Officers:-**

| | | |
|---|---|---|
| iii. | Dr.Ramnath Sonawane | Secretary |
| iv. | Smt. Nasima Shaikh | Registrar |
| v. | Shri. Rohan Sodal | Dy. Director |
| vi. | Shri. Subhash Jirange | Accounts Officer |

At the out set Shri. S. T. Sangale, Member (Eco) proposed Shri. Vinodkumar J. Tiwari, Member (Law) to Chair the meeting in accordance with the provisions of Section 9(2) read with Section 10 of the MWRRA Act, 2005 read with Regulation 9(5) and Regulation 10 of MWRRA (Conduct of Business) Regulations, 2013.The Secretary welcomed all the Members present for the meeting.

With the permission of the Chair, the meeting commenced to take up the following agenda items:

**ITEM NO. 1**

**Sub:** **<u>To confirm the minutes of the previous 7/20 Authority Meeting held on 30thJuly, 2020.</u>**

The minutes of 7/20 Authority Meeting were confirmed.

**ITEM NO. 2**

**Sub:** **Action Taken Report-**

NIL

**ITEM NO. 3**

**Sub:** **Circulars issued by GoM for information and perusal of the Authority.**

The following circular have been put before the Authority for information and perusal.

CHAIRMAN'S INITIAL

O.S.M.

| Sr No. | Subject |
|---|---|
| 1. | जलसंपदा प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता व सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यापुर्वी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाची मान्यता घेण्यासंदर्भात मार्गदर्शक सूचना (क्र. मजनिप्रा-२०२०/०१/(०१/२०), जसं (आस्था) |

The Authority took note of the circular.

**ITEM NO. 4**

**Sub:** **GRs issued by GoM for information and perusal of the Authority**.

The following GRs have been put before the Authority for information and perusal.

| Sr No. | Subject |
|---|---|
| 1. | श्री. शिवनिका संस्थान मिरगांव. ता. सिन्नर, जि. नाशिक या न्यासास दारणा धरणाच्यागोदावरी प्रकल्पाचे जलाशयातुन बिगर सिंचन मोठ्या प्रमाणात पाण्याचा हक्क (Bulk Water Entitlement) प्रस्तावास मंजुरी मिळणेबाबत. (शासन निर्णयक्र.बिसिंआ २०२०/(११३/२०)/सिं.व्य.(धो-२) |
| 2. | महाड औद्योगिक क्षेत्रासाठी सावित्री नदीतून पाणी उचलणेसाठी कोटा वाढवून औद्योगिक पाणी वापराकरिता मोठ्या प्रमाणात पाण्याचा हक्क (Bulk Water Entitlement) मंजूर करणेबाबत. (शासन निर्णयक्र.बिसिंआ २०१९/(३१४/१९)/सिं.व्य.(धो-२) |
| 3. | रायटर लाइफ स्टाईल रिसॉर्ट व हेल्थ फार्मा, मो.शिळिंब, ता.मावाळ, जि. पुणे या संस्थेस पवना जलाशयातून औद्योगिक बिगर सिंचन मोठ्या प्रमाणात पाण्याचा हक्क (Bulk Water Entitlement) प्रस्तावा समान्यता देण्याबाबत. (शासन निर्णय क्र.बिसिंआ २०१८/(४६७/१८)/सिं.व्य.(धो-२) |
| 4. | श्रीमंत बाबासाहेब देशमुख मिल्क प्रोड्युसर कं.लि.आटपाडी ता. आटपाडी, जि. सांगली या संस्थेस आटपाडी तलावातून बिगर सिंचन मोठ्या प्रमाणात पाण्याचा हक्क (Bulk Water Entitlement) प्रस्तावास मंजुरी मिळणेबाबत. (शासन निर्णयक्र.बिसिंआ २०१८/(४४४/१८)/सिं.व्य.(धो-२) |
| 5. | वैनगंगा नदीवरुन नगरपंचायत लाखांदूर जि. भंडारा पिण्याचे पाण्याकरिता १.४७ दलघमी चा मोठ्या प्रमाणात पाण्याचा हक्क (Bulk Water Entitlement) प्रस्ताव. |
| 6. | वैनगंगा नदीवरुन नगर पंचायत लाखनी जि. भंडारा पिण्याचे पाण्याकरिता १.१११ दलघमी चा मोठ्या प्रमाणात पाण्याचा हक्क (Bulk Water Entitlement) प्रस्ताव. |

The above GRs have been discussed in the meeting. With respect to said all GRs at Sr. No 5 and 6 the Authority directed that information needs to be called from EDs concerned to ascertain whether the entitlements are based on the criteria order issued by the Authority and as revised from time to time.

**RESOLUTION NO. 85**

**"RESOLVED THAT** Secretary is hereby directed to call information from concerned EDs for ascertaining whether the entitlements are based on the criteria order issued by the Authority and as revised from time to time, latest vide Resolution No. 78 dated 30/06/2020."

**ITEM NO. 5**

**Sub: Letters for information and perusal of the Authority.**

The following letters have been put before the Authority for information and perusal.

| Sr No. | Subject |
|---|---|
| 1. | महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ अंतर्गत "राज्य जल परिषद" गठित करणेबाबत. (क्र. संकीर्ण-२०२०/(प्र.क्र.०६/२०२०)जसं (आस्था) |
| 2. | महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांच्या दि. १९ सप्टेंबर २०१४ च्या आदेशाचे पालन करण्यासाठी गोदावरी नदीवर कमालपुर व प्रवरा नदीवर मधमेश्वर येथे सरीता मापन केंद्र उभारणेबाबत.(जा.क्र. मुअ/निवज/तांशा-३(१५८/२०१८)/९८०/सन २०२०) |

The Authority noted the same.

**ITEM NO. 6**

**Sub: To discuss and give extension to officers as per provisions of MWRRA (Recruitment and Conditions of Service of Employees) Regulations, 2013.**

This item was discussed in the meeting and perused the concerned officer's files.

The noting in details have been recorded by the Authority on the concerned files.

**RESOLUTION NO. 86**

**"RESOLVED THAT** Secretary is hereby directed to act as per noting recorded on the individual files and authorised to issue orders of renewal of 6 officers as shown in Appendix A."

**ITEM NO. 7**

**Sub: To discuss and give extension to staff as per provisions of MWRRA (Recruitment and Conditions of Service of Employees) Regulations, 2013.**

This item was discussed in the meeting and perused the concerned staff files.

The noting in details have been recorded by the Authority on the concerned files.

**RESOLUTION NO. 87**

**"RESOLVED THAT** Secretary is hereby directed to act as per noting recorded on the individual files and authorised to issue orders of renewalof6employees as shown in Appendix B."

**ITEM NO. 8**

**Sub:** **To discuss and give extension to the agency providing drivers on contract basis and to decide the mode of recruitment of drivers thereafter, in light of provisions of MWRRA (Recruitment and Conditions of Service of Employees) Regulations, 2013.**

या मुद्दयावर बैठकीत सविस्तर चर्चा झाली. बाहययंत्रणेद्वारे (कृष्णा मोटर्स) यांच्यासोबत केलेल्या कराराची मुदत दिनांक ३०.०९.२०२० रोजी संपुष्टात येत असल्याने त्यास १ महिन्याची मुदतवाढ देऊन दरम्यानच्या कालावधीत अन्य मार्गाने वाहनचालकांची नियुक्ती करण्याबाबत विचार करण्यात आला. प्राधिकरणातील वाहनचालकांच्या संवर्गात३ पदे नियमित व १ पद कंत्राटी तत्त्वावर मंजूर आहे. प्राधिकरणात ६ वाहने मंजूर आहेत. परंतू प्रत्यक्षात ५ वाहनांची खरेदी करण्यात आलेली आहे. प्राधिकरणात मा. अध्यक्ष, मा. सदस्य व सचिव यांना वाहन अनुज्ञेय आहे. प्राधिकरणात मा. अध्यक्ष व मा. सदस्य यांच्या रिक्त पदांच्या नियुक्तीची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. उक्त परिस्थिती विचारात घेता सद्यस्थितीत वाहनचालकांची २ पदे नव्याने निर्माण करणे अनिवार्य राहिल. शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग बी.सी.सी २०१६/प्र.क्र.२२८/A/१८/१६ ब दिनांक २१.०८.२०१९ मध्ये छोटया संवर्गातील मागासवर्गीयांकरिता आरक्षित पदे भरण्याबाबतची कार्यपध्दती दिलेली आहे.तथापि,सदर शासन परिपत्रकास शासन निर्णयबी.सी.सी २०१६ /प्र.क्र.२२८ /A /१८/१६ब, दिनांक २२.०८.२०१९ अन्वये स्थगिती दिलेली असल्याने बिंदू नामावलीनुसार आरक्षण निश्चित करुन रिक्त पदे भरता येत नाहीत.

अटी व शर्ती च्या मसुद्यावर सविस्तर चर्चा झाली. दरम्यानच्या कालावधीत नियमित नियुक्तीची प्रक्रियापूर्ण होईपर्यंत वाहनचालक तात्पुरत्या स्वरूपात रोजंदारीवर नियुक्त करण्यात यावेत. रोजंदारीवर नियुक्त होणा-या वाहनचालकास मंजूर वाहनचालकाच्या पदासाठी सातव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणीनुसार प्रचलित दराने मिळु शकणारे एकुण वेतन भागीले ३० दिवस याप्रमाणे येणाऱ्या प्रतिदिन वेतनाप्रमाणे म्हणजेच वेतनश्रेणी एस-६ (१९९००-६३२००) मधील एकुण वेतन २८,५८४भागीले ३० दिवस म्हणजेच रु. ९५३/- पूर्णांकात रू. ९५५/- देण्यात यावेत. सोबत जोडलेल्या परिशिष्ट क मधील अटी व शर्तींवर रोजंदारीवर आवश्यकतेनुसार वाहनचालक नियुक्त करण्यात यावे असे ठरले.

या परिस्थितीत प्राधिकरण ठराव करत आहे की,

CHAIRMAN'S INITIAL

<u>**ठराव क्रमांक - 88**</u>

ज्या अर्थी, बाहययंत्रणेसोबत केलेल्या कराराची मुदत दिनांक ३०.०९.२०२० रोजी संपुष्टात येत आहे;आणि

ज्या अर्थी, कृष्णा मोटर्स या यंत्रणेचे मालक श्री. संतोष परब यांचे दिनांक १४.०७.२०२० रोजी निधन झालेले असल्याने या यंत्रणेसोबत पुढे करार करता येत नाही;आणि

ज्या अर्थी, शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग बी.सी.सी २०१६/प्र.क्र.२२८/A/१८/१६ ब दिनांक २१.०८.२०१९ ला शासन निर्णयबी.सी.सी २०१६/प्र.क्र.२२८/A/१८/१६ब दिनांक २२.०८.२०१९ अन्वये स्थगिती दिलेली आहे;आणि

त्या अर्थी, असा ठराव करण्यात येत आहे की,दैनंदिनकामकाज सुरळीत ठेवण्याच्या उद्देशाने कृष्णा मोटर्स या बाहययंत्रणे सोबत केलेल्या करारास दिनांक ३१.१०.२०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात यावी. तसेच प्राधिकरणातील वाहनचालकांची पदे तात्पुरत्या कालावधीसाठी (दिनांक २२.०८.२०१९ या शासन निर्णयास दिलेली स्थगिती उठेपर्यंत) मजनिप्रा (कामकाज चालवणे) विनियम २०१३ मधील विनियम ३५ (३) मधील तरतुदीचावापर करुन रोजंदारी तत्त्वावर भरण्यात यावीत.त्यासाठीच्याअटी व शर्तीपरिशिष्ट कमधेनमूद केल्याप्रमाणे असतील.

प्राधिकरण असाहि ठराव करत आहे की,रोजंदारी तत्त्वावरवाहनचालकभरण्यासाठी सचिवांनी उक्त अटी व शर्तीनुसार प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिद्ध करावी व कर्मचारी निवड समिती द्वारे पात्र उमेदवारांची निवड सुची तयार करुन ती मान्यतेसाठी प्राधिकरणाच्या बैठकीत ठेवावी.

**ITEM NO. 9**

**Sub:** <u>**To form & constitute Staff Selection Committee for re-appointment of staff of the Authority as per the provisions of MWRRA (Recruitment and Conditions of Service of Employees) Regulations, 2013.**</u>

Secretary read out the provisions of Regulation 15 of the MWRRA (Recruitment and Conditions of Service of Employees) Regulations, 2013. After discussion it was decided to form & constitute Staff Selection Committee forappointment and re-appointment of staff.

<u>**RESOLUTION NO. 89**</u>

"**RESOLVED THAT** the following Staff Selection Committee is hereby formed for appointment and re-appointment of staff of the Authority.

| | | | |
|---|---|---|---|
| i. | Secretary | - | Chairman |
| ii. | Registrar | - | Member |
| iii. | Dy. Director (Planning)- | | Member |
| iv. | Asstt. Director (Planning)- | | Member." |

CHAIRMAN'S INITIAL

**ITEM NO. 10**

**Sub: To discuss the issue of non-finalisation of Accounts & Audit of Accounts and to take further steps.**

The issue surfaced for the first time before the Authority meeting. The Secretary explained the background of non-finalisation of Accounts for the F.Y 2017-18, 2018-19 and 2019-20. Wherein audit of F.Y 2017-18 has been completed but is pending placing before the Authority. The provisions of Section 19 of the MWRRA Act, 2005 regarding Accounts of Authority as well as all the communications received from Accounts General were read out in the Meeting. Hon. Member (Law) observed that there is no provision of internal audit. The audit has to be done by Accounts General only. The Statement of Accounts needs to be prepared by the Secretary with the help of Accounts Officer and the same will be placed before the Authority to adopt by Authority and later on be submitted to Accountant General. However, the Secretary may also take assistance of any Chartered Accountant for preparing the Statement of Accounts in accordance with the provisions of Section 8 (9) of the MWRRA Act, 2005. The preparation of accounts statements as required as per the provisions of Section 19 of the MWRRA Act, 2005be expedited in order to avoid further delay.

**RESOLUTION NO. 90**

"**RESOLVED THAT** the Secretary is hereby directed to submit the Statement of Accounts before the Authority at the earliest possible for adoption as required under the provisions of Section 19 of the MWRRA Act, 2005, so that the audit can be conducted and completed by the Accountant General."

**ITEM NO. 11**

**Sub: To discuss & decide on the issue of filling of vacant sanctioned posts in MWRRA including request to the State Govt. for deputation of the Staff & Officers.**

The Secretary elucidated the total vacant as well as regular posts in the Authority. The Secretary has submitted the statement of number of sanctioned posts, filled posts and the vacant posts which is annexed as **Annexure –D**. He pointed out that as per the provisions of Section 8(4) of the MWRRA Act, 2005, the State Government may in consultation with the Authority, depute any officer or employee on deputation to the Authority.

The Regulations, 2013 has identical provisions of hiring the employees on deputation as per the detailed procedure specified in the Regulations, 2013.

Hon. Member (Law) was of the view that the process of hiring the employees on deputation be started forthwith as per the provisions in the Regulations and the advertisement for recruitment of all 11 vacant posts by way of deputation mode be published in the newspapers and the website of MWRRA and the Government of Maharashtra for inviting applications from employees of the State Government Departments, Local bodies, Central/State Government Undertakings and other Authorities or Corporations under the State Government. The process be completed expeditiously as the Authority is running short of experienced hands. Accordingly, the following resolution is passed:

**RESOLUTION NO. 91**

"**RESOLVED THAT** the Secretary is hereby directed to initiate process expeditiously and to invite applications through an advertisement from employees of the State Government Departments, Local bodies, Central/State Government Undertakings and other Authorities or Corporations under the State Government strictly as per the provisions stipulated in the Regulations."

**ITEM NO. 12**

**Sub: Any other subject with the permission of the Chairman.**

आयत्या वेळेचा विषय म्हणून "मजनिप्रामध्ये महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम २००५ मधील कलम ८(९) नुसार सल्लागार म्हणून नियुक्त करावयाच्या अटी व शर्ती निश्चित करणेबाबत" या विषयावर चर्चा झाली. प्राधिकरणाच्या दैनंदिन कामात अर्हताधारक तांत्रिक, वित्त व विधी सल्लागाराची गरज आहे.
प्राधिकरणाने अदयापही सल्लागार नियुक्तीसाठी विनियम तयार केलेले नाहीत. सदर बैठकीत सल्लागार नियुक्तीचे विनियम तयार करून शासनाची मान्यता घेण्याचे ठरले. अदयाप या कार्यवाहीस काही कालावधी लागणार असल्याने प्राधिकरणाची कामाची निकड लक्षात घेऊनकलम ८ (९) खाली तात्पुरत्या स्वरुपातसल्लागाराची नियुक्ती करण्यासाठी अटी व शर्ती विहित करण्यातआल्या. त्या सोबत परिशिष्ट इ वर जोडल्या आहेत. त्यास अनुसरून विनियम तयार करुन त्यास शासनाची मान्यता मिळेपर्यंत, तात्पुरत्या स्वरुपात सल्लागाराच्या नियुक्तीसाठीच्या जाहीरातीत सदर अटी व शर्तीनमूदकरण्याचे ठरले.
त्यास अनुसरुन खालील ठराव पारीत करण्यात आला-

CHAIRMAN'S INITIAL

O.S.M.

<u>ठराव क्र. ९२</u>

असा ठराव करण्यात येत आहे की, विनियम तयार करुन त्यास शासनाची मान्यता मिळेपर्यंत, मजनिप्रा (कामकाज चालवणे) विनियम २०१३ मधील विनियम ३५ (३) मधील तरतुदीचा वापर करुन
तात्पुरत्या स्वरुपात सल्लागारांची नियुक्ती करावी.

असा ही ठराव करण्यात येतो की, सदर सल्लागारांची नियुक्ती करण्यासाठी MWRRA च्या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करावी व प्राप्त अर्जांची छाननी करुन पात्र उमेदवारांच्या मुलाखतीसाठी प्राधिकरणापुढे सादर करावीत.

**VOTE OF THANKS:**

The meeting was concluded with vote of thanks to the Chair and the Members present.

**Date:**
**Place: Mumbai**

**Secretary, MWRRA**

**Hon. Member (Law)**
**(Chairman of Meeting)**

**Hon.Member (Eco)**

## Appendix 'A'

| Sr. No. | Name | Designation | Remark Recorded on File |
|---|---|---|---|
| 1 | SmtNasimaShaikh | Registrar | As recorded on file. |
| 2 | Shri P. R. Gokhale | Deputy Director | As recorded on file. |
| 3 | Smt. PriyankaSakate | Asstt. Director | **AUTHORITY RESOLVED THAT,**<br>Smt. PriyankaSakte is appointed as Asstt. Director on 01/01/2020. She has not yet completed 2 years.<br><br>**THEREFORE,** as per Regulation 20(2), (3) & (4) of MWRRA (Recruitment & Conditions of Service of Employees) Regulation 2013, renewal of service of SmtPriyankaSakte, Astt. Dir is approved for the period of 01/10/2020 to 31/12/2021 on the same remuneration i.e. Rs. 81,850/- |
| 4 | Shri. D. S. Patole | Asstt. Dir | **AUTHORITY RESOLVED THAT,**<br>Shri. D.S.Patole is appointed as Asstt. Director on 22/01/2020. He has not yet completed 2 years.<br><br>**THEREFORE,** as per Regulation 20(2), (3) & (4) of MWRRA (Recruitment & Conditions of Service of Employees) Regulation 2013, renewal of service of Shri. D.S. Patole, Asstt. Dir. is approved for the period of 01/10/2020 to 31/12/2021 on the same remuneration i.e. Rs. 81,850/- |
| 5 | Shri. A.K. Kalkhair | Administrative officer | As recorded on file. |
| 6 | Shri S. T. Dhamnkar | Desk Officer | As recorded on file. |

## Appendix 'B'

| Sr. No. | Name | Designation | Remark Recorded on File |
| --- | --- | --- | --- |
| 1 | Smt. Aprana Dhanmeher | Accounts Asstt. | As recorded on file. |
| 2 | Smt.Priyanka Satpute | Lower grade Steno | **AUTHORITY RESOLVED THAT,**<br>Smt.Priyanka Satpute is appointed as Lower Grade Steno on 06/02/2020. She has not yet completed 2 years.<br><br>**THEREFORE,** as per Regulation 20(2), (3) & (4) of MWRRA (Recruitment & Conditions of Service of Employees) Regulation 2013, renewal of service of Smt. Priyanka Satpute, Lower Grade Steno is approved for the period of 01/10/2020 to 31/12/2021 on the same remuneration i.e. Rs. 55,050/- |
| 3 | Smt. Tejasvi Marabhal | Lower grade Steno | **AUTHORITY RESOLVED THAT,**<br>Smt Tejasvi Marabhal is appointed as Lower Grade Steno on 07/02/2020. She has not yet completed 2 years.<br><br>**THEREFORE,** as per Regulation 20(2), (3) & (4) of MWRRA (Recruitment & Conditions of Service of Employees) Regulation 2013, renewal of service of Smt. Tejasvi Marabhal, Lower Grade Steno is approved for the period of 01/10/2020 to 31/12/2021 on the same remuneration i.e. Rs. 55,050/- |
| 4 | Smt.Mansi Parab | Lower grade Steno | As recorded on file. |
| 5 | Smt.Minal Bhavsar | Clark- Typist | As recorded on file. |
| 6 | Smt. Snehal Vaidya | Reception | As recorded on file. |

CHAIRMAN'S INITIAL

परिशिष्ट क

<u>प्राधिकरण कार्यालयात रोजंदारीवर भरावयाच्या वाहनचालकाच्या नेमणूकीसाठी अटी व शर्ती</u>

१. अ) शैक्षणिक अर्हता : अ) वाहनचालक म्हणून रोजंदारीवर नियुक्त असलेली व्यक्ती किमान ८ वी उत्तीर्ण असावी. तसेच वाहनचालकास मराठी लिहिता, वाचता येणे आवश्यक राहील व हिंदी, इंग्रजीचे किमान ज्ञान आवश्यक राहील.

ब) वाहनचालक म्हणून रोजंदारीवर नियुक्त केलेल्या वाहनचालकाजवळ वाहन चालविण्याची वैध अनुज्ञाप्ती असेल.

ब) वय : रोजंदारीवरील वाहनचालकाचे वय १८ वर्षांपेक्षा कमी व ५८ वर्षांपेक्षा जास्त नसावे.

क) अनुभव : (१) शासकीय, सार्वजनिक किंवा खाजगी उपक्रम यांमधील वरिष्ठ अधिकाऱ्यांचे मोटार वाहन चालविण्याचा ५ वर्षाचा प्रत्यक्ष अनुभव.
(२) उत्तम शरीरयष्टी असावी आणी संबंधित क्षेत्राच्या प्रदेशाचे ज्ञान असावे.
(३) वाहतूक नियमांचे उत्तम ज्ञान असावे.

२. वेतन : अ) वाहनचालक म्हणून रोजंदारीवर नियुक्त होणा-या व्यक्तीस दररोज रु. ९५५/- वेतन देण्यात येईल.

ब) वाहनचालक म्हणून रोजंदारीवर नियुक्त होणा-या व्यक्तीस कार्यालयीन कामाच्या वेळेनंतर काम केल्यास प्रति तासाला रु. ४०/- प्रमाणे अतिकालिक भत्ता अनुज्ञेय असेल

क) रोजंदारीवर नियुक्त होणा-या वाहनचालकास उपस्थित दिवसांचे वेतन अदा करण्यात येईल. मात्र इतर सार्वजनिक सुट्टीचे वेतन त्याला अनुज्ञेय असणार नाही.

३. रजा : वाहनचालक म्हणून रोजंदारीवर नियुक्त केलेल्या व्यक्तीस अनुपस्थित दिवसाचे वेतन देय होणार नाही.

CHAIRMAN'S INITIAL

O.S.M.

४. वर्तन : अ) वाहनचालक म्हणून रोजंदारीवर नियुक्त केलेली व्यक्ती गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेली नसावी. गुन्हेगारी पार्श्वभूमी निदर्शनास आल्यास त्यांची नियुक्ती संपुष्टात येईल. तसेच कर्तव्यावर असताना वाहनचालकाची वागणूक शिष्ट संमत असेल. (उदा. वाहनचालकाने वाहतूकीचे नियम पाळणे, वागणूक सौजन्याची ठेवणे, वाहनाजवळ उपलब्ध असणे), वाहनचालकाकडे मोबाईल असावा, तथापि वाहन चालवित असताना मोबाईलचा वापर करणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

ब) वाहनचालकाने प्राधिकरणाच्या कामकाजाच्या कालावधीत नशापान/धूम्रपान व तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन करु नये.

५. प्राधिकरणाच्या कार्यालयाचे कामकाज आठवडयातील सोमवार ते शुक्रवार व अपवादात्मक परिस्थितीत सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी देखील चालू राहील. कार्यालयीन वेळ सकाळी ०९.३० ते सायंकाळी ०६.१५ अशी आहे. तथापि वाहनचालकांची कामकाजाची वेळ कार्यालयीन वेळेच्या एक तास आधी व एक तास नंतर (सकाळी ०८.३० ते सायंकाळी ०७.१५) अशी राहील.

६. वाहनचालक म्हणून रोजंदारीवर नियुक्त होणा-या व्यक्तीस प्राधिकरणातील कोणत्याही पदावर नियुक्तीचा हक्क राहणार नाही.

७. वाहनचालक म्हणून रोजंदारीवर नियुक्त होणा-या व्यक्तीने ज्या कामासाठी नियुक्ती दिली आहे, ते काम सचोटीने व प्रामाणिकपणे करणे बंधनकारक राहील.

८. वाहनचालक म्हणून रोजंदारीवर नियुक्त केलेल्या व्यक्तीचे काम समाधानकारक नाही असे प्राधिकरणाच्या निदर्शनास आल्यास त्याला नोटीस न देता, त्याची नियुक्ती संपुष्टात आणण्यात येईल.

९. वाहनास अपघात झाल्यास व दुर्देवाने वाहनचालकास कोणत्याही स्वरुपाची वा गंभीर स्वरुपात इजा झाल्यास वाहनचालकास वैद्यकीय खर्चाची अथवा नुकसान भरपाईचे कोणतेही दायित्व महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणावर असणार नाही. परंतु, वाहनाच्या विम्या संदर्भातील विमा कंपनीच्या धोरणानुसार अनुज्ञेय नुकसान भरपाई अनुज्ञेय ठरेल.

१०. वाहनचालकास त्याचेकडे दिलेले वाहन दुसऱ्या कोणत्याही व्यक्तिस देता येणार नाही.

११. वाहन प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या ठिकाणी वाहनतळावर ठेवण्याची जबाबदारी वाहनचालकाची राहील. इतर दुसऱ्या ठिकाणी वाहन पार्क करता येणार नाही. त्याकरिता प्राधिकरणाचे सचिव यांची रितसर परवानगी घ्यावी लागेल.

CHAIRMAN'S INITIAL

MINUTE BOOK PAGE

HELD AT ON TIME

टीप: अनुभव याबाबतच्या प्रमाणपत्राच्या, वाहन परवाना प्रमाणपत्र, शौक्षणिक अर्हता

१. प्रमाणित प्रती सोबत जोडणे आवश्यक आहे.

२. वाहनचालकांच्या पदसंख्येत परिस्थितीनुरूप बदल होऊ शकतो.

स्थळ मुंबई -

दिनांक ०९.१०.२०२०-

Sd xxx

सचिव

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई

CHAIRMAN'S INITIAL

O.S.M.

## परिशिष्ट इ

**प्राधिकरण कार्यालयात सल्लागार म्हणून नियुक्त करण्यासाठी निश्चित करावयाच्या अटी व शर्ती-**

अ) नियुक्तीची कार्यपद्धती-

सल्लागार पदासाठी मजनिप्रा च्या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिद्ध करुन नियुक्ती करता येईल. त्याची लिंक शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करावी.

शैक्षणिक अर्हता:

१) तांत्रिकसल्लागार- स्थापत्य अभियांत्रिकी मधील पदवी आवश्यक. पाणीवापर व्यवस्थापन किंवा व्यवस्थापन यातील पदव्युत्तर पदवी धारकास प्राधान्य.

२) वित्त सल्लागार- उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठातून कोणत्याही शाखेचा पदवीधर असावाआणि भारतीय सनदी लेखाकार संस्थेचा (ICAI) चा सदस्य असावा

३) विधी सल्लागार -उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठातून कोणत्याही शाखेचा पदवीधर असावाआणिमान्यताप्राप्त विद्यापीठ / संस्थेकडील किमान बॅचलरऑफजनरल लॉ (BGL) ची पदवी आणि भारतीय कम्पनी सचिव संस्थेचा (ICSI) चा सदस्य असावा.

वय : उमेदवाराचेवय ३० वर्षांपेक्षा कमी व ६० वर्षांपेक्षा जास्त नसावे.

अनुभव:किमान ३ वर्षांचा अनुभव असणे आवश्यक. प्राधिकरणातील काम केल्याचा अनुभव असणाऱ्यास प्राधान्य.

ब) सल्लागारांसाठीपारिश्रमिक –

सल्लागार म्हणून नियुक्त होणाऱ्या व्यक्तीस त्याची शैक्षणिक अर्हता व अनुभव विचारात घेऊन ठोक स्वरुपात पारिश्रमिक (करTDS वजा करुन) देण्यात येईल .एकदा निश्चित केलेल्या ठोक स्वरुपातील पारिश्रमिकात किमान २ वर्ष वाढ अनुज्ञेय राहणार नाही . तसेच कोणत्याही रजा, प्रवास भत्ता, वाहन भत्ता, घरभाडे भत्ता इ. कुठलाही भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

क) नियुक्तीचा कालावधी व मुदतवाढ-

सल्लागार म्हणून पात्र होणाऱ्या उमेदवारास प्रथमतः अस्थायी स्वरूपात एक वर्षाच्या कालावधीसाठी नियुक्ती देण्यात येईल. त्यानंतर त्याचे कामकाज समाधानकारक असल्यास पुढील मुदतवाढ देण्यात येईल. पुढिल मुदत वाढिचा कालावधीदोन वर्षांपेक्षा जास्त असणार नाही.

CHAIRMAN'S INITIAL

ड) <u>नियुक्तीच्या सर्व साधारण अटी व शर्ती -</u>

१) सल्लागार म्हणून नियुक्त झालेली व्यक्ती प्राधिकरणाचा अधिकारी/कर्मचारी असणार नाही. व त्या व्यक्तीस महाराष्ट्रजल संपत्ती नियमन प्राधिकरण (सेवाप्रवेश आणि कर्मचाऱ्यांच्या सेवेच्या शर्ती) विनियम, २०१३ मधील लाभ ( रजा, वेतन ई.) लागूहोणारनाहीत. तथापिसल्लागारास सर्व सार्वजनिक सुट्ट्या उपभोगता येतील.

२) सल्लागार म्हणून नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने ज्या कामासाठी नियुक्ती दिली आहे, ते कामसचोटीने व प्रामाणिकपणे करणे बंधनकारक राहील. तसेच त्या व्यतिरिक्त प्राधिकरण वेळोवेळी जी कर्तव्ये /जबाबदारी पार पाडण्याचे निर्देश निर्देश देईल त्यानुसार काम करणे बंधनकारक राहील.

३) प्राधिकरणाने सल्लागार नियुक्तीसाठी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (सेवाप्रवेश आणि कर्मचाऱ्यांच्या सेवेच्या शर्ती) विनियम, २०१३ च्या विनियम ८(९) मध्ये केलेल्या तरतुदीनुसार विनियम तयार करुन त्यास शासनाची मंजूरी मिळाल्यानंतर व शासन राजपत्रात प्रसिद्ध केल्यानंतर अस्थायी स्वरुपात केलेली नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

४) प्राधिकरणानेसल्लागारम्हणून केलेली नियुक्ती रद्द करण्याबाबत शासनाने निर्देश दिल्यास सदर नियुक्ती तात्काळ प्रभावाने रद्द झाल्याचे समजण्यात येईल.

इ) <u>सेवा समाप्ती -</u>

१) सल्लागार म्हणून नियुक्त केलेल्या व्यक्तीचे काम समाधानकारक नाही असे प्राधिकरणाचे मत झाल्यास त्याला एक महिन्याची पुर्व सुचना देऊन, त्याची नियुक्ती संपुष्टात आणण्यात येईल.

२) सल्लागार म्हणून नियुक्त केलेली व्यक्ती नियुक्ती नंतर सल्लागार म्हणून काम करण्यास ईच्छुक नसल्यास त्याने प्राधिकरणास किमान एक महिन्याची पुर्व सुचना देणे त्याचेवर बंधनकारक राहील.